
ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 9 | ISSUE - 3 | NOVEMBER - 2022

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# महात्मा ज्योतिराव फुले व सत्यशोधक समाज यांचे कार्य :



प्रा. डॉ. एस.एस. इंगोले
श्री. तुळशिरामजी जाधव कला व विज्ञान महाविद्यालय वाशिम.

**सारांश :**

भारतातील बहुजन समाजाचे उध्दारक, दलीत–पतित यांचे उध्दारक भारतातील बहुजनांच्या शोषणाचे वर्णन करणारे पहिले समाजसुधारक म्हणुन ज्योतिराव फुले यांचे नाव घेतल्या जाते. भारतामध्ये युरोपीयनांचे आगमन एक महत्वपूर्ण घटना आहे. कारण युरोपीयनांनी भारतातील बहुजन, दलीत स्पृश्य– अस्पृश्य समाजाला शिक्षणाची दारे खुली केली. त्याचा परिणाम असा झाला की, महात्मा ज्योतिराव फुले सारखे विद्यार्थी यांच्या विचारांना आकार मिळाला. युरोपीयनांचा मानवतावाद बुध्दीनिष्ठा, विज्ञानवाद याचा प्रभाव ज्योतिबा यांच्यावर पडला. आणि या वैचारीक प्रभावाने ज्योतिबा फुले यांनी भारतातील धार्मीक, सामाजीक अंधश्रध्देचा अभ्यास केला. अशा व्यवस्थेने हजारो वर्षापासून मानसिक गुलाम असलेल्या भारतीय समाजाला मुक्त करण्यासाठी फुले यांनी सत्यशोधक समाज या संस्थेची स्थापना केली. या माध्यमातून जातीभेद , अस्पृश्यता, स्त्रियांची गुलामगिरी या विषयी जनजागृती घडवून आणली. याच कार्याने आजचा समता, स्वातंत्र्य, मुलभूत हक्क, शिक्षणाचा अधिकार असलेला आधुनिक भारतीय समाज उभा झाला. याचे खरे श्रेय महात्मा ज्योतिराव फुले यांना जाते.

## प्रस्तावना :

आधुनिक भारताच्या जडणघडनीला खऱ्या अर्थाने सुरुवात ही एकोणीसाव्या शतकाच्या पुवार्धात झाली. म्हणूनच एकोणीसाव्या शतकाची सुरुवात भारतात सामाजीक, राजकीय, धार्मीक प्रबोधनाचा प्रारंभबिंदू मानल्या जातो. युरोपातील राष्ट्रांना प्रेरणा देणारे आधुनिक विचार प्रवाह त्यांच्या आगमनाने भारतभूमीत आले. तत्कालीन भारत हा अनेक जुन्या रुढी, प्रथा, परंपरा ज्या की, आजच्या मानवतावादी मुल्यांच्या विरुध्द होत्या. त्यामध्ये गुरफटून गेलेला होता. भारतीय समाजात मोठ्य प्रमाणात निरक्षरता, अंधश्रध्दा, अज्ञान, दारिद्र्य, जातीभेद, अनिष्ठ चालीरिती, शिवाशीव अशा अनेक दोषांचे प्राबल्य होते. याची जाणीव जेव्हा, भारतातील सुशिक्षीत आणि लोकचळवळीचे नेते यांना झाली. तेव्हा, त्यांनी पाश्चीमात्यांच्या विज्ञानवादातून, संस्कृतीमधून बुध्दीवाद, विज्ञाननिष्ठ, ज्ञाननिष्ठ, स्वातंत्र्यमुल्ये आत्मसात केली. अशा समाजसुधारक नेत्यांनी भारतात सामाजीक, सांस्कृतीक पुनरुत्थानाची चळवळ सुरु केली. अशा चळवळीचा एक महत्वाचा अंग म्हणजे महात्मा ज्योतिबा फुले यांनी सुरु केलेली सत्यशोधक चळवळ आहे. या चळवळीने महाराष्ट्र प्रांताच्या संदर्भात विचार केल्यास दलीत उध्दाराच्या चळवळीचा प्रारंभ करणारे पहिले समाजसुधारक म. फुले होते.

## संशोधनाची उदिृष्टे :

प्रस्तुत संशोधन लेखासाठी पुढिल उदिृष्टे ठरविण्यात आलेली होती

१ : १९ व्या शतकातील भारतातील सामाजिक असमानतेचा अभ्यास करणे.
२ : महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जीवन परीचय अभ्यासने
३ : महात्मा ज्योतिबा फुले यांच्या समाज सुधारणेचा अभ्यास करणे.
४ : सत्यशोधक चळवळीचा अभ्यास करणे.

## संशोधनाची गृहीतके :

प्रस्तुत संशोधन लेखासाठी पुढिल गृहीतके मानली होती.

१ : १९ व्या शतकात भारतामध्ये मोठयाप्रमाणात सामाजिक विषमता होती.

२ : भारतातील दलीत समाजाच्या उत्थानाकरीता महात्मा फुले यांनी शिक्षणाचा प्रसार केला.

३ : महात्मा फुले यांनी स्त्रीयांच्या शिक्षणाचा भारतात पुढाकार घेतला.

## महात्मा ज्योतिबा फुले :

११ एप्रिल १८२७ रोजी खानवाडी येथे एका सामान्य माळी कुटूंबात ज्योतिबांचा जन्म झाला. प्राथमिक शिक्षण पूर्ण केल्यावर स्कॉटीश मिशनरीच्या शाळेत इंग्रजी शिक्षण घेण्याला सुरुवात केली. याच ठिकाणी त्यांना पाश्चिमात्य मिशनऱ्यांचा मानवतावाद, एकेश्वरवादी विचार त्यांच्या मनाला स्पर्श करुन केले. त्यामधून त्यांना पाश्चात्य विचारांची ओळख व्हायला लागली. ज्योतिराव फुले यांच्या विचारांना व कार्याला खरी दिशा थॉमस पेन च्या राईट ऑफ मॅन कॉमन सेन्स् या ग्रंथातील विचाराने मिळाली. ज्योतिबाला सामान्य व्यक्ती म्हणून अपमानीत केल्या गेले. या घटनेचा त्यांच्या मनावर दुरगामी परिणाम झाला. आणि येथूनच कर्मठांच्या अत्याचारातून बहुजन समाजाला जागृत करण्याचे काम त्यांनी केले. या कार्यात त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांनी त्यांना मोलाची साथ दिली.

## सत्यशोधक समाजाची स्थापना व तत्वे :—

तत्कालीन भारतीय समाजात उच्च कोटीची विषमता अस्तित्वात होती. समाजातील विशीष्ट वर्गाच्या जुलूमाचा प्रतिकार करणे, त्यांच्या गुलामगिरीतून बहुजन समाजाला मुक्त करणे, यासाठी खरा लढा ज्योतिरावांनी उभारला. अज्ञानी बहुजन समाजाला ज्ञानी करणे, मानव धर्माचे व ईश्वर भक्तीचे खरे स्वरुप बहुजन समाजासमोर ठेवने, या उद्देशाने त्यांनी २८ सप्टेंबर १८७३ रोजी पुणे येथे सत्यशोधक समाजाची स्थापना केली. सर्वसाक्षी जगत्पती त्याला नको मध्यस्थी हे सत्यशोधक समाजाचे ब्रिदवाक्य होते. याच चळवळीतून ज्योतिबा फुले यांनी सामाजिक, धार्मिक, आर्थिक गुलामगिरीविरुध्द लढा दिला. ज्योतिराव फुले यांच्यासारख्या समाज सुधारकाच्या प्रयत्नाने आणि कार्याने जो बहुसंख्य बहूजन समाज सामाजिक, धार्मिक, आर्थिक, गुलामगिरीत खिचत पडलेला होता. त्यांच्यामध्ये नवसंजिवनी निर्माण झाली.

१. ईश्वर एक असून, तो सर्वव्यापी व निर्गुण, निर्विकार सत्यरुप आहे. सर्व मुनष्यप्राणी त्याची प्रिय लेकरे आहेत.

२. ईश्वर भक्ती करण्याचा प्रत्येक मानवास पूर्ण अधिकार आहे. सर्व साक्षी परमेश्वराची भक्ती, करण्यास मध्यस्थाची गरज नाही.

३. मनुष्य जाती किवा जन्मावरुन श्रेष्ठ ठरत नसून, कर्मावरुन श्रेष्ठ ठरतो.

४. पुर्नजन्म, कर्मकांड, जपजाप्य या सर्व गोष्टी अज्ञान मुलक आहेत.

५. कोणताही ग्रंथ सर्वस्वी प्रमाण व ईश्वर प्रणीत नाही.

वरील प्रकारचे तत्वे मान्य करुन सत्यशोधक समाजाने ईश्वराचे अस्तीत्व मान्य केले आहे. परंतू ईश्वर भक्ती करीता मध्यस्थाची भूमिका अमान्य केली आहे. सर्व मानवप्राणी ईश्वराची लेकरं आहेत. त्यामुळे त्यांच्यात उच निचता असू शकत नाही. ही उच निचता मानवी जन्मावर आधारीत नसून, मानवी कर्मावर आधारीत आहेत. वरील तत्वावर आधारीत सत्यशोधक समाजाच्या कार्याची दिशा होती.

## सत्यशोधक समाजाची कार्ये :

ज्योतिराव फुले यांच्या मनावर मिशनरी शिक्षणातून मानवतावाद व सामाजिक समता ही मुल्ये रुजून गेली. आणि याच आधारावर त्यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाची कार्ये निश्चीत झाली. तत्कालीन बहुजन समाजाच्या, दलीत, स्त्रियांच्या मागासलेपणाचे व त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाचे मुख्य कारण शिक्षणाचा अभाव आहे हे फुलेंनी जाणले. तत्कालीन भारतीय समाजात मुठभर दांभीक लोकांचे शिक्षणावर वर्चस्व होते. त्यामुळे फुले यांनी बहुजन समाज, दलीत, स्त्रिया यांच्या शिक्षणाचे कार्ये हाती घेतले. इ.स. १८८२ च्या हंटर कमीशन समोर बहुजन समाजास सक्तीचे प्राथमिक शिक्षण द्यावे, असा आग्रह धरला. महाराष्ट्रात अस्पृश्य व स्त्रियांच्या शिक्षणाची मुहूर्तमेढ फुले यांनी प्रथमच रोवली. त्यांनी इ.स. १८४८ ला पुणे येथे मुलींची पहिली शाळा काढली तर, इ.स. १८५१ मध्ये अस्पृश्यांसाठी पहिला शाळा सुरु केली. मुलींना शिकविण्यासाठी शिक्षीका उपलब्ध होत नव्हत्या म्हणून त्यांनी सावित्रीबाई फुले यांना शिकवून शिक्षिका बनविले.

ज्योतिराव फुले यांनी स्त्रियांचा समाजातील समान दर्जाकरीता आग्रह धरला. स्त्रियांशी संबंधीत बाल विवाह, सती प्रथा, बहुपत्नीत्व, शिक्षणाला विरोध, विधवा विवाहाला विरोध अशा अनेक अनिष्ठ प्रथा समाजात मान्य होत्या. त्या प्रथांना फुलेंनी विरोध करुन, बालहत्या प्रतिबंधक गृह सुरु केले. स्त्रियांच्या दयनीय स्थितीत सुधारणा व्हावी, यासाठी अथक परिश्रम घेतले.

भारतीय समाजात असलेल्या मानवतावाद विरोधी स्पृश्य—अस्पृश्यता जातीभेद शुद्र अतिशुद्र व्यवस्थेचा प्रखर विरोध केला. उच्च वर्णीयांविरुध्द शुद्रांच्या मुलभूत हक्कासाठी लढा देणारे व त्यांच्या शिक्षणाचा प्रसार व्हावा, यासाठी प्रयत्न करणारे फुले महाराष्ट्रातील पहिले समाजसुधारक होते. मानवा—मानवातील जातीचे बंधने दुर करुन आपल्या समाजात त्यांना समता प्रस्थापित करायची होती. त्यासाठी त्यांनी आपली लेखनी व वाणी झिजवली. ज्योतिरावांचा कोणत्याच समाजाला विरोध नव्हता, तर कर्मकांडे, अंधश्रध्दा यांचे स्तोम माजविणाऱ्या प्रवृत्तीला त्यांचा कडाडून विरोध होता. अस्पृश्यांच्या मानवी हक्काचे उल्लंघन होवू नये, यासाठी मानवाच्या मुलभूत हक्काला त्यांनी महत्व दिले. मानवाचे मुलभूत हक्क त्यांना मिळाले तर, विश्व कुटूंबाचे स्वप्न साकार होईल, असे त्याचे मत होते. ईश्वराला फुलेंनी अमान्य केले नव्हते तर या विश्वाची निर्मिती करणारा निर्मिक त्यांना मान्य होता. हजारो वर्षापासून धर्माचे अवडंबर, कर्मकांड, जातीभेद, उच—निचता स्पृश—अस्पृशता दृष्ट चालीरिती याच्यातून बहुजन समाजाला मुक्त करणारा सामाजिक क्रांतीचा अविष्कार म्हणजे सत्यशोधक समाज होय.

ज्योतिराव फुले यांनी सत्यशोधक चळवळच उभी केली नाही, तर महाराष्ट्रातील समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी त्यांनी मोठ्या प्रमाणात साहित्याची निर्मिती केली. त्यामध्ये ब्राम्हणाचे कसब, गुलामगिरी, शेतकऱ्यांचा आसूड, ईशारा, अस्पृशाची कैफीयत, सार्वजनिक सत्य धर्म इत्यादी ग्रंथ उल्लेखनिय आहेत. या साहित्यामध्ये फुले यांनी स्वातंत्र्य, समता या संबंधीचे विचार मांडून त्याचा पुरस्कारही केला. फुले यांनी आपल्या विचारांचा प्रसार करण्यासाठी दिनबंधू नावाचे वृत्तपत्रही सुरु केले. या माध्यमातून समाजातील दलीत, पतीत, अन्यायग्रस्त यांच्या दुखांना वाचा फोडली. तसेच समाजाचे दांभिक वृत्तीच्या लोकांना कोरडे ओढले. समाजातील सावकार, जमीदार, सरकार, धार्मिक वर्चस्व असलेले लोकांना कसे फसवितात याच्याविषयी प्रचंड जनजागृती केली. यासाठीच फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. या सत्यशोधक समाजाने समाजाची उन्नती करण्यासाठी बहुसंख्य वर्गाची व स्त्रियांची मानसिक, सामाजीक, गुलामगिरी नष्ट करुन त्यांच्या उन्नतीचा मार्ग मोकळा करुन दिला. म्हणूनच  दलीतांचे उध्दारक, मानव धर्माचे प्रचारक, स्त्रियांचे कैवारी अशा शब्दात त्यांचा गौरव केल्या जातो.

## निष्कर्ष :

भारतीय समाजामध्ये १९ व्या शतकामध्ये मोठयाप्रमाणात सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकिय विषमता अस्तीत्वात होती. भारताच्या मोठया भुभागावर इंग्रजांची सत्ता होती. या भुभागावर आधुनिक शिक्षण व्यवस्था इंग्रजांनी सुरू केली. या शिक्षण व्यवस्थेमधील मानवतावादीचे धडे महात्मा फुले यांनी अभ्यासले त्यामधुनच त्यांच्या व्यक्तीमत्वाला आकार येणे सुरू झाले. त्यांनी मानवता हाच खरा धर्म मानला , जाती, वर्ण, असमानतावादी आहेत सर्व मानव ईश्वराची लेकरे आहेत म्हणुन त्यांनी त्याला विरोध केला. हजारो वर्षापासुन जातींच्या नावाखाली शोषीत समाजाला जागृत करण्याचे कार्य त्यांनी सुरू केले. त्यासाठी आधुनिक शिक्षणाचा आग्रह धरलाच नाही तर भारतातील शिक्षणापासुन कोसो दूर समाजाला शिक्षण देण्याला सुरवात केली. समाजातील जाती व्यवस्था, वर्ण व्यवस्था यांचा विरोध केला. भारताला समृध्द करायचे असेल तर समाजातील शोषीतांना त्यांचे अधिकार मिळायला पाहीजे असे त्यांना वाटत होते.

## संदर्भ :

१. शरद पाटील, मार्क्सवाद — फुले —आंबेडकर, मावळाई प्रकाशन पुणे, २०१८
२. विपीन चंद्र, आधुनिक भारत का इतिहास, ओरियंट ब्लॅकस्वान लिमीटेड, नई दिल्ली, २००८
३. अनिल कठारे, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, विद्या बुक्स पब्लीशर्स औरंगाबाद २०१५
४. आर. आर. शुक्ल, संपादक, आधुनिक भारत का इतिहास, हिंदी माध्यम कार्यान्वय निदेशालय दिल्ली
५. राजीव अहीर, आधुनिक भारत का इतिहास, स्प्रेक्ट्म बुक्स प्रा ली. नई दिल्ली. २०१५